
नितीन राठोड
प्रेमवेडा

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नितीन राठोड

लिखित

ललितलेख

# प्रेमवेडा

# प्रेमवेडा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

प्रेमवेडा (ललितलेख)

नितीन राठोड

पत्ता- हरंगुळ खुर्द ता. जि. लातूर.

भ्रमणध्वनी -९८३४३३१९२२/९९७०२८५७०१

ई-मेल - nitinsrathod7@gmail. com

nitin rathod <nitin6556@gmail.com>

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

आमच्या कुटुंबात कोणी साहित्यिक नाही वा तसे वातावरणही नाही. मध्यमवर्गीय आमचे कुटुंब. आई-वडिलांची अपेक्षा मुलानं शिक्षण घेवून मोठी नोकरी करावी. मी देखील त्यासाठी प्रयत्न केला नव्हे करत आहे. जगण्याचा, शिकण्याचा संघर्ष अजूनही सुरुच आहे.

सध्याचा काळ सर्वांनाच अस्वस्थ करणारा असला तरी वाळवंटातील ऑॲसिस सारखं 'प्रेम' ही अडीच अक्षरं आहेत. मला देखील हे प्रेम वगैरे सर्व काही खोटं वाटायचं... प्रेम म्हणजे फक्त टाइमपास असतो असंच वाटत होतं. आणि मला प्रेममय असं काही लिहिण्याचा छंद देखील नव्हता. मात्र, म्हणतात ना प्रेम केल्यानं होत नाही, तर ते आपोआप होत असतं.... तसंच काहीसं माझ्याबाबतीतही घडलं. आणि प्रेम या अडीच अक्षरी शब्दाची किमया कळली. जे प्रत्यक्षात माझ्या आयुष्यात घडत गेले त्याच्याशी जोड देत कल्पनेचे इमले रचून लिहित गेलो. प्रेमामुळं लिहायला लागलो. त्याआधी केवळ टेबल पत्रकारिता करताना बातम्या लिहित असायचो.

२१ एप्रिल २०१६ हा दिवस मला कधीच विसरता येणार नाही... कारण या दिवसापासून तर माझा आणि तिचा प्रेमप्रवास सुरु झाला होता. या प्रेमातूनच शब्दांना धुमारे फुटत गेले. दैनिक एकमत आणि दैनिक युवा छत्रपतीमुळे 'प्रेम' या विषयावर लिहिताना, प्रेमाच्या विविधांगी बाजू समजल्या.

या लिखाणामुळे अनेक मित्र-मैत्रिणी जोडता आल्या. अनेकांच्या फोनवरून प्रतिक्रिया आल्या. काही सकारात्मक तर काही नकारात्मकही होत्या. या

प्रतिसादामुळे लिहिण्यासाठी हुरुप येत गेला तिचा माझ्या सोबत कधी अबोला, कधी लाडी गोडी, कधी तिचा विरह यालाच अनुसरून सगळे ललित लेख स्फुरत गेले. आणि हे लिहिण्यासाठी मला उद्युक्त केले ते माझी सखी आणि निखळ, सुस्वभावी मैत्रीण दीपिका, आणि पुण्यातील मैत्रीण ऋतूजा तसेच माझे गुरु शिवाजी कांबळे आणि माझा दिलदार दोस्त जुमान मियाँ या सर्वांच्या सहकार्यातूनच आज प्रेमवेडा ललित संग्रह लिहिण्याचे काम सफल झालेय.

माझे हे पहिले-वाहिले पुस्तक तरूणाईला अर्पण करताना अत्यानंद होत आहे. या पुस्तकात काही चुकून माकून राहुन गेलं असंल... काही सुचवावं असं वाटत असंल... तर आपल्या सूचनांचे स्वागत आहे...

धन्यवाद...!

आपला

-नितीन राठोड



ऋणनिर्देश

जुमान मियाँ, प्रा. अनिल चवळे,

शाहिदा पठाण(लेखिका),

देवेंद्र शिरूरकर(पत्रकार, लेखक),

गणपती दादा राठोड, श्रीकांत कोटलवार,

अविनाश चापकानडे,

विजय भगत, मल्लेश्वर कोटंबे,

गुंडप्पा गायकवाड, ज्ञानेश्वर तेलंगे,

अहिल्या कस्पटे, दीपिका, अनिकेत

कुलकर्णी, उमेश देशमुख, नागेश गुरमे

# प्रस्तावना

नितीन राठोड यांचा ‘प्रेमवेडा’ हा पहिलाच ललितसंग्रह ई-साहित्य प्रतिष्ठानच्यावतीने प्रकाशित होत आहे. दाखल होत आहे. नितीन राठोड हे मागील काही वर्षांपासून पत्रकारिता, ई-सुविधा केंद्र अशा माध्यमातून कार्यरत आहेत. विविध नियतकालिक व वृत्तपत्रातून ते अविरतपणे ते ललित लेखन करीत असतात. ‘प्रेमवेडा’ हा त्यांचा प्रेम या विषयावरील ललितसंग्रह आहे. या पुस्तकातील सर्व ललित त्यांनी आपल्या खास शैलीत लिहिले आहेत. या ललितांना त्यांनी वास्तवतेची जोड दिलेली आहे. अत्यंत ओघवत्या, सोप्या भाषेत त्यांनी आपल्या लेखणीतून प्रेमाच्या विविध छटा रेखाटल्या आहेत. तरुणाईच्या प्रेमभावना यामध्ये टिपल्या आहेत. तरुणाईत प्रेमवेडे सगळेच असतात, पण त्यातही काहींच्या प्रेमाचे हिंदोळे अनोखेच असतात. युवावस्थेतील प्रियकर-प्रेयसीचा प्रेमप्रवास, विविध मयुरपंखी आठवणी, स्वानुभव, खऱ्या प्रेमाची महती असं बरंच काही या ललितसंग्रहात आहे. कोणीतरी म्हटले आहेच की, क्षण एक पुरे खऱ्या प्रेमाचा.... या खऱ्या गणल्या जाणाऱ्या प्रेमप्रवासातून अनेकांना जगण्याची दिशा मिळते तर अनेकजण उद्ध्वस्त होऊन जातात.

नितीन यांनी त्यांच्या प्रेमवेडा या ललितसंग्रहात ‘तिच्या भेटीची आस’ या ललितामध्ये आपल्या आवडत्या प्रेयसीला भेटण्याची आतुरता अगदी सुंदरपणे मांडली आहे. या आतुरतेमधील आनंदही आगळाच असतो, हे सांगितलेय. ‘काय हा माझा गुन्हा’ यात प्रेयसी अचानकपणे त्याला सोडून जाते, कसलाही निरोप नाही की संदेश

नाही. त्यानंतर आलेला विरह आणि या विरहातून तिच्यावर खरं प्रेम केले, हाच काय माझा गुन्हा, असा सवाल यातील प्रियकर स्वगत म्हणतो. तर 'तुझीच सवय', 'अन् तिचे मन माझे झाले', 'तेरा साथ है तो... ' या ललित लेखांतून तिच्या आणि त्याच्या भावबंधाचे पदर उलगडत जातात. हे लेख वाचताना प्रत्येला आपल्या खऱ्या प्रेमाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. या शिवाय ' आय प्रॉमिस यू', 'तू हो म्हणेपर्यंतचा प्रवास', 'तुझ्या प्रेमात मी... ', 'माझे काय चुकले', 'क्षण एक पुरे प्रेमाचा' आणि 'आणि का दूर केलंस मला' अशा या सगळया ललित लेखातून प्रेमाच्या उत्कट भाव-भावना नितीन यांनी आपल्या काळजातून मांडल्या आहेत. प्रेमवेडपणा हाअगदी सोप्या भाषेत आणि अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे.

करिअर घडवण्याच्या तरूणाईच्या वयात खरे प्रेम हे अनेकांना ऑक्सिजन ठरते, तर काहींना मात्र निराशाच्या गर्तेत ढकलते. जीवनाची आणि जगण्याची दिशा अनेकांची बदलून जाते. काहीजरी असले तरी नितीन राठोड यांचे हे पुस्तक सर्वांना वाचावे वाटेल, असेच आहे. या पुस्तकातील प्रेममय स्पदंने प्रेमवेड्याला साजेशीच आहेत. सगळयांना हा ललितसंग्रह नक्की आवडेल, यात मुळीच शंका नाही. नितीनच्या साहित्य लेखनाला हार्दिक शुभेच्छा!

- शिवाजी कांबळे

पत्रकार, लातूर

# शुभेच्छा!

प्रिय, नितीन



तुझं पुस्तक प्रकाशित होतंय हे ऐकुनच मला अतिशय आनंद होतोय.

आजकाल ‘प्रेम’ ही एक फॅशन झालीय. परंतु तुझ्या पुस्तकातील हृदयस्पर्शी ललित लेख वाचून असं वाटलं की खरं प्रेम आजही शिल्लक आहे. एखाद्या चित्रपटाच्या कथेलाही लाजवेल असे तुझे सर्व ललित लेख आहेत. हा ललितसंग्रह वास्तवतेचा स्पर्श असलेला आहे. ते वाचत असताना हुबेहूब चित्र माझ्या डोळयासमोर उभं राहत होतं. आणि या स्वप्नांच्या चंदेरी दुनियेत मी रंगून गेले होते.

तुझ्या या पुस्तकातील ललित लेखांचे शीर्षक, शब्दरचना, वाक्यरचना अतिशय सुंदर पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. ते वाचताना मला मनस्वी आनंद होतोय. खरंतर तुझ्या या पुस्तकामध्ये उल्लेख करण्याइतकी किंवा त्यावर भाष्य करण्याइतकी मी मोठी नाहीयं. मला जसं जमेल तसं दोन शब्द मी

लिहिण्याचा प्रयत्न केलाय. नितीनला, ई- साहित्य प्रतिष्ठानला व विशेष म्हणजे हे पुस्तक वाचणाऱ्या सर्व वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

नितीनचे हा लेखसंग्रहाचे पुस्तक सर्वांनाच आवडेल, यात शंका नाही. तुझे सगळेच ललित लेख सर्वांनाच भावतील, असा विश्वास मला आहे. या माझ्या विश्वासाबरोबरच मी माझ्या या शुभेच्छापर मनोगताला पूर्णविराम देते.

भव्य दिव्य स्वप्ने बघ... ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घे... प्रामाणिक व कर्तव्यदक्ष बन.... तुला उदंड यश मिळो, यासाठी आणि तुझ्या पुढच्या वाटचालीसाठी मन:पूर्वक सदिच्छा !......

तुझीच मैत्रीण

दिपीका

# नितीन शिवाजी राठोड



नितीन शिवाजी राठोड हे संवेदनशील युवा नवलेखक, पत्रकार, असून साहित्य, सामाजिक, शिक्षण अशा विविध विषयावर त्यांनी विपूल लेखन केलेले आहे. त्यांनी वृत्तपत्रविद्या ही पदवी तसेच बीसीएसपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे. अनेक वर्षांपासून ते पत्रकारिता, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय आहेत. प्रामुख्याने लातूर येथील दैनिक एकमतच्या युवा स्पदंन पुरवणीत त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. शिवाय युवा छत्रपती या वृत्तपत्रातही ललित लेखन केलेले आहे. हरंगुळ ता. लातूर सारख्या ग्रामीण भागातून येवून त्यांनी आपले वेगळे आस्तित्व निर्माण केलेले आहे.

नितीन राठोड यांचा चांगला जनसंपर्क असून त्यांना वाचन आणि साहित्य लेखनाची मोठी आवड आहे. वृत्तपत्रांच्या विविध साहित्य पुरवण्यात ते सातत्याने लिहित असतात. पत्रकारितेबरोबरच ते ई-सुविधा केंद्राच्या माध्यमातून लोकांना विविध सेवा पुरवतात. संत सेवालाल महाराजांवर प्रबोधनात्मक ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा मानस आहे.

संपर्क - हरंगुळ खुर्द ता. जि. लातूर.

भ्रमणध्वनी -९८३४३३१९२२/९९७०२८५७०१

ई-मेल - nitinsrathod7@gmail. com

**nitin rathod** <nitin6556@gmail.com>

सहकार्य

मला माझे विचार शब्दांत मांडण्यासाठी,

मला व्यक्त होण्यासाठी प्रवृत्त केले,

वेळोवेळी प्रतिक्रिया देऊन माझ्या लेखनाला हुरुप वाढवला ती म्हणजे माझी प्रियसी (योयो) आणि माझी अगदी जिवलग मैत्रीण नेटीझन्सची सिंघम म्हणून ओळख असलेली दिपीका त्यांच्या सहकार्यामुळेच माझे हे स्वप्न पुर्ण होत आहे.

# प्रेमाचे गोड विष

रोजच्या प्रमाणे दिवस जगत होतो. तेच कॉलेज, तेच काम व रोजची पण तीच ती दैनंदिन क्रिया चालू होती. साधारणत: जून महिन्यात बारावीचा निकाल लागलेला होता. मित्रांचे व पाहुण्यांचे फोन येत होते. याचा निकाल बघा.. त्याचा बघा. ठरल्याप्रमाणे चालू असल्यामुळे मी माझ्याच गुंगीत होतो.

अशात आमच्या घरी एक पुण्याहून पाहुणी आली. तिचाही बारावीचा निकाल असल्यामुळे ती माझ्याकडे आली व मला निकाल पाहण्यास सांगितले. ही आमची पहिलीच भेट होती. ती परीक्षेत पास झाल्यामुळे आनंदी होतीच म्हणून आम्ही सहजच गप्पा मारत असताना ओळखी वाढल्या. त्यानंतर रोज आमचे भेटणे, शैक्षणिक तसेच सामाजिक विषयावर चर्चा होऊ लागल्या व त्यामुळे आमची चांगली मैत्रीही जुळली. तिचं ते अतिशय सुंदर, निरागस आणि मनमोकळेपणाने हसणं, तिचं माझ्याशी बोलणं मलाही खूपच आवडू लागलं. अन् अशातच ती परत त्याच्या गावी जाण्यास निघाली. या वेळी माझ्या मनात तर असे वाटू लागले की हा सहवास कायम माझ्यासोबत राहावा. परंतु माझ्या मनात असताना देखील तिला मी बोलू शकत नव्हतो कारण मला भीती वाटायची की ती काय म्हणेल. या भीतीपोटी मी काहीच बोललो नाही.

ती तिची बॅग पॅक करून तिच्या दाजीसोबत निघाली. जात असताना मला जवळ येऊन नेहमीसारखं हसत म्हणाली, मी जाऊ का? चल येते मी माझ्या मनात तर खूप येत होते की तिला सर्व काही सांगून टाकावे परंतु भीती होती की तिला काय

वाटेल? म्हणून सर्व काही मनात ठेवून तिला  पाणावलेल्या डोळयांनी हो म्हणालो. तिला पण ते दिसले असते परंतु रात्र असल्यामुळे तिने लक्ष केले नाही.

मी जड आवाजात म्हटले, “आता कधी येणार?”

ती म्हणाली, “काही सांगू शकत नाही, असेच जमले तर कधीतरी नक्की येईन. ओके बाय मी जाते उशीर होत आहे.” असे म्हणत तसेच ती निघून गेली.

परंतु मला तर रात्रभर झोप येत नव्हती सारखा तिचाच विचार मनात येत होता.

साधारणत: 5 ते 6 दिवसांनंतर मी माझ्या दैनंदिन कामात असताना ती मला परत दिसली. मला वाटले की हा एक भास आहे. म्हणून मी दुर्लक्ष केले.

मग ती माझ्या जवळ आली व म्हणाली, “अरे नितीन, मी तुला किती ओरडत आहे. पण तू आहेस की, माझ्याकडे पाहातदेखील नाहीस.” मला तर विश्वासच बसत नव्हता ती परत आली आहे म्हणून. पण मी जेव्हा भानावर आलो तेव्हा मी माझ्या मनाला म्हणालो, गॉड इज ग्रेट यार कारण की देवानेच चमत्कार केला व हिला पुन्हा पाठविले.

मी जोरजोरात हसत म्हणालो, अरे योयो तू कशी काय आलीस? तेव्हा तिने सांगितले,  मला आता माझे शिक्षण ताईच्या घरी राहून पूर्ण करायचे असून त्यासाठीच मी येथे आली आहे. हे ऐकून मला तर खूपच आनंद झाला. आम्ही शहरातील एका महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी गेलो पण काही फायदा  झाला नाही म्हणून परत घरी आलो.

आता मी पक्का विचार केला होता की माझ्या मनातील तिला सांगूनच टाकावे परंतु हिम्मत होत नव्हती म्हणून मला माझ्या लाडक्या लहान बहिणीचा आधार घ्यावा लागला. यामध्ये 50 टक्के रस्ता साफ झालेला होता व आता आमचा सहवास पूर्वीपेक्षाही जास्त होऊ लागला. आमच्यामधील नातं हे मैत्रीपुरतं उरलेलं नाही याची दोघांनाही जाणीव झाली होती. मी म्हणालो "योयो मला काहीतरी बोलायचं होतं तुझ्याशी "' मी तिच्याशी धाडस करून बोललो. मला तू खूप आवडतेस. **आय लव्ह यू** "'

परंतु काही शांततेनंतर उठून जात असताना तिने माझा हात पकडला. मला वाटले ही आता भांडणार, रडणार, काही तरी सॉलीड बोलणार. परंतु ती नजरेत नजर घालून म्हणाली, तुही मला खूप आवडतोस.

असे म्हणत ती लांब जाऊन माझ्या बहिणीकडे जाऊन बसली. मला तर खूप आनंद झाला होता मग त्यासोबतच गप्पा, फोन एसएमएस सुरू झाले व दिवसामागे दिवस, महिने जात राहिले व मी तिच्यासोबतची भविष्याची स्वप्ने रंगवत गेलो.

एके दिवशी ती मला जवळ येऊन म्हणाली, आता कॉलेजचे वर्ष संपत आले आहे. परीक्षा संपल्यानंतर मी परत पुण्याला जाणार आहे. असे ती मला सांगून नेहमीच सतावत राहते. आता तूच सांग प्रिये, मला हे प्रेमाचे गोड विष पाजून मरण्यासाठी एकट्यालाच सोडून का जात आहेस?

# तिच्या भेटीची आस

कॉलेजचे माझे पहिलेच वर्ष कॉलेज सुरू होऊन 2 महिने झाले होते. वर्गात सर्वच मुले-मुली गप्पा मारायचे; पण आमच्या वर्गात एक मुलगी होती. ती तशी स्वभावाने फार चंचल तर होतीच पण वागण्यात पण खूपच बिनधास्त होती. त्यामुळे ती मला खूपच आवडायची. कॉलेजमध्ये पहिल्यांदाच तिला पाहिलं होतं.... आणि पाहता क्षणी मी तिच्या प्रेमात पडलो.

त्या दिवशी ब्ल्यू कलरच्या ड्रेसमध्ये तर ती खरंच खूप छान दिसत होती ती.... कानात मोठे रिंग... कपाळावर चंद्रकोर.... डोळयावर येणारी तिची बट... तिची हेअर स्टाईल खरंच मला खूपच आवडत होती तिची आणि माझी कधी अशी भेट घडेल असं मला कधीच वाटलं नव्हतं.... कारण त्या दिवशी तिला क्लासमध्ये येण्यास उशीर झाला म्हणून सरांनी तिला वर्गाबाहेर काढले. ती एकटीच बाहेर बसली होती. त्यामुळे मी तिच्याकडे पाहून सहज हसलो व त्यातच आमची नजरानजर झाली. तिला त्यावेळी एकटीला वर्गाबाहेर सरांनी काढल्यामुळे खुप वेगळे वाटत होते आणि त्यातच मी त्याकडे पाहून हसल्यामुळे तिचा चेहरा उतरला होता. त्यामुळे मी तिला सॉरी बोलायचं ठरविलं.

पण तिला बोलण्याची हिम्मत होत नसल्यामुळे तिच्या मैत्रिणीला मी बोललो खरंच तिला सॉरी सांग... मला खरंच माहिती नव्हतं तिला राग येईल म्हणून.... नंतर तिनेच येऊन एक स्मित हास्य देत इट्स ओके म्हणाली आणि माझं नाव विचारलं. मी माझे नाव सांगितल्यानंतर तिनेही तिचे नाव सांगितले खरंच ती जितकी सुंदर दिसत होती तितकेच तिचे नावपण सुंदर होते (मयुरी).

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघेही कॉलेजमध्ये जाण्यासाठी फार उत्साही होतो कारण आज पुन्हा त्यांची भेट होणार होती. असेच कॉलेचच्या बाहेर गाणे गुणगुणत

असताना तिची व माझी भेट झाली. तिनेच मला पायऱ्यांवर गाठून प्रॅक्टिकल आणलेस का? असे विचारले. मात्र तिने बोलता क्षणीच मी प्रॅक्टिकलची फाईल तिच्या हातात ठेवली आणि आमच्या गप्पांना सुरुवात केली. आम्ही दोघे मिळून क्लासमध्ये गेलो.

असेच दिवसांमागून दिवस जात होते मलाच नाही तर तिला पण मी आवडत असल्याचे मला कळाले होते. त्यामुळे माझ्या मनातील गुपित सांगून टाकायचे ठरवले. पण कॉलजचे पेपर संपल्यामुळे ती गावाकडे निघाली, मला तिला सांगायचे होते पण तसेच राहून गेले, नंतर तिचा कोणताही संपर्क झाला नाही. आजही मी एकांतात तिचीच आठवण काढत बसतो व ती परत माझ्या आयुष्यात येईल याच आशेवर आहे

# तेरा साथ है तो....

**तुझ्या डोळयात पाहिल्यावर काहीच सुचत नाही मला... तू जवळ असताना सारखा आनंद होतो मला... तू दूर असूनही मला तुझ्याजवळ राहायचे आहे... खरंच तुझ्या हृदयात आपले एक घर बनवायचे आहे... तूच माझ्या जीवनाची सुरुवात आणि तूच शेवट आहेस...**

प्रिय (योयो) बघ ना आज आपल्या प्रेमाला बघता बघता चार वर्षे पूर्ण झालीत. कॉलेजचे ते दिवस मला आजही आठवतात. तुझी ती भिरभिरती नजर, इकडे-तिकडे बघण्याचा तुझा खोटा प्रयत्न आणि हळूच चोरट्या नजरेने तुझे माझ्याकडे पाहणे. हे सर्व बघून गालातल्या गालात तुझ हसणं. तुझ्या या अशा करण्याचं मला

सारखं कुतुहल वाटायचं. तुझा तो शांत चेहरा सतत मला शोधायचा. कॉलेजच्या दुसऱ्या मजल्यावरून हळूच खाली वाकून तुझे माझ्याकडे बघणे आणि मी पाहिल्यावर लगेच मागे होऊन दुसरीकडे बघण्याचं तू नाटक करणे. या सर्वांची आपल्या दोघांनापण नकळतपणे सवयच झाली होती आठवतं तुला? माझीपण नजर तुला पाहण्यासाठी सारखी भिरभिरायची एकदा तुझ्या मैत्रिणींसोबत तू गप्पा मारत थांबली होती व त्याच वेळी आपली भेट झाली तेव्हापासून मीदेखील नकळत तुझ्या प्रेमात पडलो तू आहेस म्हणून मी आहे

तुझ्याशिवाय जीवन अपूर्ण आहे खरंच सांगतो (योयो ) माझं सारं विश्व तुझ्यामुळे बदललं. आपलं हे अबोल प्रेम असेच चालत राहिले असेच आपल्या दोघांच्या कॉलेजचे शेवटचे वर्ष उजाडले. आपल्या प्रेमातला असा एकही टप्पा नाही जिथे आपण प्रेम व्यक्त केले नाही.

बघ ना आज आपल्या प्रेमाला चार वर्षं झाली. या चार वर्षांत आपण अनेक संकटांना तोंड दिलं. तू माझी सोबत कधीच सोडली नाहीस. त्यामुळेच तुझ्या प्रेमाने मला जगण्याची एक नवी दिशा मिळाली. ज्यांनी कोणी सांगितले आहे ते खरंच सांगितलं आहे की, प्रेम कधी सुखासुखी मिळत नाही. कारण  अपेक्षेप्रमाणे समाजाकडून आपल्या प्रेमाला विरोच होता़ हे मला माहीत होतं. पण प्रेम ठरवून तर होत नाही ना! मी तुझ्यावर आजपर्यंत नि:स्वार्थपणे प्रेम केलं. खरंच माझं आयुष्य तुझ्यापासून सुरू होतं आणि तुझ्यात संपतं. माझा त्या देवावर व  माझ्या प्रेमावर विश्वास आहे़ कारण देव आपल्याशी कधीच धोका नाही करणार. कारण आपल्या या प्रेमाचा धागा त्यानेच तर बांधलेला आहे़

## ते हळवे क्षण...

मला आजही तो दिवस आठवतो तू जेव्हा लातूरमध्ये आलीस व येथेच राहिलीस. मला तर असे वाटले की, तू काय माझ्या जीवनातील धागा होते का नाही ते. परंतु बघ ना आज आपल्या प्रेमाच्या नात्याला बघता बघता 6 महिने पूर्ण झाले आहेत परंतु मला तर असे वाटते की, आपण किती तरी जन्मांपासून एकत्र आहोत व हे आपले पवित्र नाते कधीही न संपणारे आहे.

मी आपल्या लाडक्या बहिणीचे खूप खूप आभार मानतो. कारण की, आपल्या दोघांच्या प्रेमाचा धागा विणण्यामध्ये तिचा खूप मोलाचा वाटा होता. जर ती नसती तर आपल्या मनातील भावना व्यक्त झाल्याच नसत्या. आपली आधी मैत्री, नंतर एसएमएस, कॉल व नंतर प्रेम किती प्रवास केला ना हृदयाने. कसे आपले प्रेम टप्प्याटप्प्याने फुलत गेले आणि मी तुझ्यात गुंतत गेलो.

खरंच मला तर माझ्यावर विश्वासच बसत नाही. हेच ते डोळे आहेत का? जे मला नेहमीच टाळायचे. तेच डोळे आज माझ्या प्रेमाने भरून आले आहेत. हा भास तर नाही ना.. पण मला ते जाणवत आहे... जेव्हा तू मला फोन ठेवताना स्वीट ड्रीम म्हणताना हळूच म्हणाली, मीस यू. तेव्हाच मला कळाले होते की, मी एकटाच नाही तर तूही माझ्या प्रेमात पडली आहेस.

तुझ्यासोबत चालताना मी नेहमीच गप्प राहायचो, आठवते का तुला मी, एकटक तुझ्याचकडे पाहायचो.. तू म्हणायची काय पाहतोय? तेव्हा मात्र मी उत्तर दिलं नव्हतं पण आज देतो. एकटक पाहून मनात तुला साठवत राहायचो. तू जवळ

नसलीस की चेहरा तुझा आठवत राहायचो. खरच मला अजूनही विश्वास नाही बसत.. तू हल्ली किती गोड हसतेस... कधी कधी मध्यरात्री तुझे एसएमएस वाचताना माझं मन किती आनंदी होत असतं.

मी तुझ्या प्रेमात वेडा तर नाही ना होत. का तू माझ्या प्रेमाला नाही नाही म्हणून त्रास दिलास पण तो त्रासही किती मस्त होता ना. “योयो’ की जितके तू नाही नाही म्हणत हळूच माझ्या मिठीत सामावून जाणं... खरंच मला

आजही विश्वास नाही बसत. कारण किती जपतेस मला. त्यामु‍ुळेच की काय तुझी आठवण आली की मी गुदमरून जातो... कारण तू कुठेच नसतेस तरीही फार जवळ असतेस. अगदी जवळ काय मस्त प्रवास होता. पण तितकाच जीवघेणादेखील होता. तुला मी काही तरी विचारण्यापासून ते तू हो म्हणेपर्यंतचा. अगदी अवस्मिरणीय असा प्रवास... कधीही न विसरू शकणारा.

## तिच्या भेटीची आस...

तिनं सर्व काही माग सारून सरळ आपल्या गावी परत निघून जात होती, पण जाताना ती यावेळी मला भेटावयास आली होती... तीचे नेहमीसारखं हसणं, बोलणं, असं काहीही नव्हतं. नजरा नजर मिळविण्याची दोघांनाही हिम्मत होत नव्हती. का कोण जाणे, पण मनाला असं वाटत होतं की, काहीतरी व्हावं व इथेच रहावं, पण काय करणार ! हे तर होणारच होतं. जाताना ती मला बारीक आवाजात म्हणाली... मी जाऊ का ?, असं बोलताना तिच्या चेहऱ्याकडं पाहिलं असता आम्हा दोघांनाही अश्रू अनावर झाले होते. दोघे पण एकमेकांना अलिंगन देऊन हमसून रडत असताना आम्हास असे वाटू लागले की, जणू काय इथं आसवांचा पूरच वाहात आहे.

मीच तिला समजाविण्याचा प्रयत्न केला व म्हटलं ये सखी, सांभाळून जा व मी चेहरा वळवीला कारण तिचं ते रडणं पाहून मलाच मनाला खूप असह्य वेदना होत होत्या व तिचा चेहरा पाहण्याइतपत माझ्यात हिम्मत नव्हती. अशातच ती जाण्यासाठी सरसावली.. कारण तिच्या गाडीची वेळ झाली होती... दुसऱ्या दिवशी तिचा फोन आला तिनं सांगितलं की मी घरी पोहोचलेय... तिचे फोनवरील ते शब्द ऐकून खूप आनंद झाला नि हरखूनही गेलो होतो. तिचा विरह असह्य होता... तिच्या भेटीची आस लागली होती...

मग काही दिवसांनंतर माझ्यासाठी मोठा योग आला. ती ज्या पुणे शहरात राहते, त्याच शहरात माझ्या मित्राचं लग्न सोहळा होता. त्यासाठी मी मोठ्या

आतुरतेने निघालो... आता माझ्या सखीची भेट या शहरात होईल... म्हणून मनस्वी आनंदी झालो होतो. पुण्यात पोहोचलो... तिला काचरतच फोन केला...

बोलल्याप्रमाणे ती मला भेटण्यासाठी पुण्यातील रेल्वे स्टेशनला आली... तिला पाहताक्षणी मला खुप आनंद झाला... तीही प्रफुल्लीत झाली होती. दोघांनाही भेटी आस होती. कारण तब्बल दोन महिन्यांनंतर आम्ही भेटत होतो. आम्ही दोघेही एकमेकांना पाहून साधारणत: 10 मिनिटे डोळयांत डोळे घालून पाहातच राहिलो... की, काय बोलावं कसं बोलावं व कोठून सुरुवात करावी हेच आम्हा दोघांना सूचत नव्हतं. थोडा वेळ बसून गप्पा मारल्या. यावेळी मला तर असं वाटत होतं की, हा आमच्या भेटीचा काळ काळीजकुपीत जपून ठेवावा... कैद करून टाकावा... मनसोक्त गप्पा मारल्यानंतर आम्ही दोघेही तेथून माझ्या मित्राच्या लग्नासाठी निघालो... तिथे पोहोचल्यानंतर आम्ही आमच्या मित्रमंडळीत मश्गूल झालो.

लग्न सोहळा अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला... मी तर खूप आनंदी होतो, कारण आज तिची भेट झाली होती. मी निघण्याच्या तयारीत होतो... तिला सोडून घराकडे परतावं असं वाटतच नव्हतं... पण जावं तर लागणारच होतं. मित्रांनी परत येण्याचा आग्रह केला. मी तिच्या चेहऱ्याकडं वळून पाहिलं. मी जाणार म्हणून ती आपली उदासी लपवू शकत नव्हती. लातूरला येण्याबद्दल ती म्हणाली, मी माझ्या घरच्याशी बोलून पाहते. मलाही तुझ्या शहरात यावं वाटतं...

**मी जड पावलांनी तिचा निरोप घेतला अन् लातूरकडे जाण्यासाठी स्टेशनकडे निघालो... तिच्या दुसऱ्या भेटीची आस मनात घेऊन.....**

# तुझीच सवय

तू माझ्या आयुष्यात आलीस, तेव्हापासून माझ्या जीवनाला एक वेगळं वळण लागलं होतं. कळलंच नाही, की मी केव्हा प्रेमात पडलो. मी प्रथम तुला होकार दिला, तेव्हाही मला वाटत नव्हतं, की मी प्रेमात पडलो आहे.

आज आपल्या प्रेमाला तीन वर्षं पूर्ण झाली. या तीन वर्षांत आपन अनेक संकटांचा सामना केला. या तीन वर्षांत बरंच काही घडून गेलं. थोडं रुसणं , थोडंसं हसणं... तरी आपल्यातील नावीन्य काही कमी झालं नाही. आपण एकमेकांमध्ये एवढं सामावून घेतलं आहे, की फक्त चेहऱ्याचा हालचालीवरून आपल्याला काय बोलायचं आहे, ते आपल्या दोघांना हे कळत होते. तू माझ्यासाठी काहीच केलं नाहीस, असं तुला का वाटतं ? तू माझ्यासाठी भरपूर काही केलं आहेस. आज मी जे काही आहे, त्याचं पूर्ण श्रेय तुलाच आहे. आज आपण अशा वळणावर उभे आहोत, की पुढे काय होईल, याची कल्पना नाही.

मात्र, बघ ना आज तू माझ्या जवळ नसतानाही मी रोजच देवाकडे तूझ्यासाठी काहीतरी मागत राहतो. कारण नेहमीच मला माझ्या डोळयांना तुला आनंदी पाहावसं वाटते. खरच सवय झाली आहे आता तू येणार नाहीस हे माहित असतानाही तूझी वाट पाहण्याची... सवय झाली आहे आता तूझ्या एसएमएस ची तासनतास वाट पाहण्याची... सवय झाली आहे. आता तूझ्या फोन ची दिवसभर वाट पाहण्याची... सवय झाली आहे आता 24 तास तूझ्यासाठी फेसबुकवरती ऑनलाइन राहण्याची**... सवय झाली आहे. आता तू कितीपण दुखावलं तरी सगळ मनात ठेवून तूझ्यासमोर हसण्याची... सवय झाली आहे. आता माझं मन मारून तुझं मन**

**जपण्याची... सवय झाली आहे. आता तू बोलली नाहीस तर होण्याऱ्या त्रासाची... सवय झाली आहे. आता तू कितीपण मला दुःख दिले तरी रडताना डोळयातून पाणी लपवण्याची.... तूला मनवताना माझी काहीही चुक नसताना उगाच तूला सॉरी बोलण्याची... सवय झाली आहे. आता न सुटनारी कोडी एकट्यानेच सोडवण्याची.... सवय झाली आहे. आता फक्त आणी फक्त तूझ्याशीवाय एकट्याने जगण्याची. सवय झाली आहे. आता तूझ्या आठवणी सोबत दिवस आणि रात्र जागून काढण्याची.... सवय झाली आहे. आता तूझ्यावर वेड्या सारखं प्रेम करण्याची...**

पण बघ आजही तू मला बोलत नाहीस. खुप त्रास होतो रे मला या गोष्टीचा दुरावा आहे.. हा पण मन तर आपले एकच आहे. ना खरचं सांगतो प्रणाली तू सोबत नाहीस प्रत्यक्षात; परंतू या माझ्या हृदयात तर तूच आहेस ना. असे काय झाले कि आपल्या प्रेमात इतके मोठे वादळ निर्माण झाले व होते की नव्हते झाले. अरे तुझ्यावर प्रेम करणं जर ही माझी चुक असेल तर ती चुक मी केली आहे. मात्र ती चुक तुला कधी कळालीच नाही...

# तुझा अबोला

प्रिये, बघ ना आज (योयो) आपल्या मैत्रीला पाहता पाहता चार वर्षे पूर्ण झाली आहेत. या चार वर्षांत आपण एकमेकांना किती सांभाळून घेतलं. कधी तू माझ्यावर रुसायचीस तर कधी मी तुझ्यावर रुसायचो; पण ते फक्त काही वेळासाठीच... नंतर तूच मला बोलायचीस व आपण दोघंपण सर्व विसरून राहायचो (योयो).

मागील चार वर्षांपासून आपण एकमेकांना ओळखतो. आपल्यात चांगली मैत्री आहे. नकळत दररोज एकमेकांना आपण भेटतो आणि एसएमएस व चॅटिंग देखील करतो. बघ ना कधी स्वत:लाच विचारून जोपर्यंत आपण एकत्र असतो तोपर्यंत एक वेगळाच आनंद आपल्या दोघांच्याही मनाला स्पर्श करत असतो. मात्र या पत्राद्वरे ते मी सांगू शकत नाही, हेही तितकेच खरे आहे. मी यापूर्वी असे पत्र लिहिलेले नाही आणि यानंतरदेखील लिहीणार नाही. याचे कारण सांगायचे झाले तर मला आजपर्यंत कोणावर प्रेम झाले नसेल किंवा तुला आता पत्र पाठवण्याची हीच योग्य वेळ असेल म्हणून. म्हणूनच मी तुला हे पत्र लिहितोय.

आज अचानक पावसाने मला तुझी आठवण करून दिली. मी खिडकीबाहेर पाहात उभा होतो. तेव्हा मला एक जोडपं जाताना दिसलं आणि मला असा भास झाला, की, ते दोघे आपणच आहोत. आपलंच प्रेम या पावसाच्या टपोऱ्या थेंबांमध्ये एकमेकात गुंतत आहे, एकमेकांना आधार देत आहे. आणि एकमेकांच्या भावनांमध्ये चिंब भिजत आहे. मला तुझी इतकी आठवण आली की चक्क, ते पावसाचे थेंब माझ्या पापण्यांना ओलावून गेले. मन जड झालं आणि एक विचित्र अस्वस्थता मला जाणवू

लागली, वाटलं, आता सर्व बंधने तोडावीत व चटकन फोन उचलून माझ्या मनातील सर्व भावना तुझ्यासमोर व्यक्त कराव्यात आणि सांगून टाकावं......

(योयो) मला तू खूप आवडतेस.... आय लव्ह यू. मात्र, बघ ना इतक्यात वीज कडाडली आणि मी शुध्दीवर आलो. तेव्हा मला वाटले की, मी तुला हे सर्व काही सांगितल्यानंतर तू नाही म्हणाली तर माझे काय होईल? माझ्याबद्दल काय वाटेल? तू म्हणशील यासाठी तू माझ्याशी मैत्री केलीस? यासाठी तू माझी इतकी काळजी घ्यायचास? या सर्व प्रश्नांत मी दोन दिवसांपासून रेंगाळत आहे.

पण आता नाही. कारण आता मी ठरवले आहे. काही झालं तरी तुला जे खरं आहे, ते सर्वकाही सांगून टाकायचे. म्हणून त्यासाठीच तुला हे पत्र लिहिण्याचे मी धाडस करत आहे व आज मी तुला या पत्रातून विचारतो आहे, माझ्याशी लग्न करशील का? तुला हे सारे वाचून जरा विचित्र वाटेल; परंतु प्लीज मला समजून घे.

हे पत्र वाचल्यानंतर तुला जर राग आला तर प्लीज.. प्लीज मला तू सांग. हवं तर माझ्यावर रागव, पण अबोला धरू नकोस.. कारण एक वेळ तुझा नकार मी मोठ्या हिमतीने पचवू शकतो मात्र तुझा अबोला मला नाही पचवता येणार

तुझाच, नितीन

# माझे काय चुकले?

तू माझ्या आयुष्यात आलीस अन् या वेड्याला जगण्याची एक नवीन दिशा दिली. पण असे काय झाले की त्या दिवशी तू माझ्यावर रुसलीस. आज शेवटी तुझाच चेहरा पाहून, तू पुन्हा बोलशील याच आशेवर हे लिहिण्याचे धाडस करत आहे.

चांगले असेल की नाही माहीत नाही, पण दोन शब्द पुन्हा तुझ्यासाठीच लिहित आहे. वेळ कसा लवकर  निघून जातो ना? तू आणि तुझे संवाद हरवून किती क्षण झाले. रोजच तुझा चेहरा आठवतो मी अन् तू माझ्यावर  का रुसली, म्हणून स्वत:वर रागावत राहतो.

खरंच (योयो)  तुझे असणे काय असते ते मला तुझ्या जाण्याने कळले आहे. तुझी किंमत नेहमीच तू नसल्यावर मला जाणवत राहते. किती नाजूक होते ना ते क्षण, जे जपत आलो आहे मी. **माझं तुझ्यावर प्रेम आहे आणि जी व्यक्ती मला या जगात सर्वांत जास्त आवडते त्याची तर मी काळजी करणारच ना... दिवसाची सुरुवात करण्यापूर्वी मला सर्वांत जास्त आवडणाऱ्याचा  म्हणजे तुझाच आवाज ऐकून दिवसाची सुरुवात करावी असे वाटत असेल तर यात माझे काय चुकले....**

(योयो) जर मी चुकलो तर बरोबर करायला तुझी साथ हवी आहे, जर मी हरलो तर मला प्रेरणा द्यायलादेखील तुझी साथ हवी आहे. कसं सांगू तुला जर मी मेलो तरीसुद्धा माझे डोळे बंद करायला मला तुझा हात हवा आहे... असे नेहमी तूच मला सांगायचीस ना.... मग काय झाले. आज अशी अचानकपणे तू माझ्यावर रुसली आहेस.

काल तुझ्यासोबत बोलता बोलता सहजच मी तुला म्हणालो, विसरेन तुला; पण खरंच इतके, सोपे नाही तुला विसरणे.... जितका मी तुला विसरण्याचा प्रयत्न करतो, तितकीच तुझी आठवण येत राहते.... डोळे झाकतो निराशेने अन् तुझाच चेहरा समोर दिसतो, चारचौघात असलो तरी त्यांना विसरून, फक्त तुझ्याच आठवणीत रमतो.... खूप दु:ख आहे हृदयात या, तुला सांगू की नको. तुला सांगितल्यावर तुलाही दु:ख होईल की काय म्हणून मी स्वत:च एकटा अश्रूबरोबर आजकाल खेळत राहतो.... असाच अचानक कधीतरी खूपच उदास झालो तर तुझ्या त्या काही आठवणींना उजाळा देत राहतो. तू जवळ नाही म्हणून स्वत:वरच राग व्यक्त करत राहतो.... तू परत माझ्या आयुष्यात येशील याच आशेवर मी जगत राहतो....

## का दूर केलंस मला ?

तूच सांगितले होतेस  ना, की जेव्हा आपण कोणावर तरी जीव लावतो तेव्हा ती व्यक्ती कोणासाठी स्पेशल असो वा नसो पण आपल्यासाठी ती आपल्या जिवापेक्षाही प्रिय असते. मग  असे काय झाले की आज आपल्या नात्यामध्ये इतका दुरावा निर्माण झालाय? नजरेपासून दूर मात्र माझ्या अंत:करणापासून जवळ असलेल्या प्रिये... जीवनामध्ये तर प्रत्येकाचीच भांडणे होत असतात. पण असे काय झाले की कालच्या एका वादळाने आपल्या पवित्र प्रेमालाच वाहून नेले... आठव ते दिवस जेव्हा आपण एकमेकाशिवाय जगू शकत नाही, असे म्हणायचो आणि सतत बारीकसारीक गोष्टींमध्ये आपण नेहमी एकमेकांचा विचार करायचो. सारखी तू मला सांगायचीस की,

**तूझ्यासाठीच जगायचे आहे मला,**

**तुझ्या हृदयातच राहायचंय मला,**

**तुझ्या सुखात जोडीदार व**

**तुझ्या दु:खामध्ये भागीदार**

**व्हायचेय मला.**

पण असे काय झाले की तू ते सर्व काही विसरून इतकी दूर गेलीस की  एका वादळाप्रमाणे आपल्या आयुष्याचे  होत्याचे नव्हते झाले? तुला वाटत असेल की आपण असे दुरावल्यामुळे खुश आहोत; पण मला नक्कीच माहीत आहे आपण एकमेकांना सोडून जगू शकत नाही. प्रेमामध्ये  भांडणे तर होतच राहतात. ज्या प्रेमामध्ये भांडण

नाही, अशामध्ये मजा तरी काय? पण सांग ना इतके मनावर घेण्यासारखे काय होते की चक्क तू माझा चेहरादेखील पाहायला तयार नाहीस. तुला तू केलेली चूक वाटत नाही का? का तुला फक्त मी केलेलेच चूक आहे असे वाटते. जर का तुला तसे वाटत असेल तर त्यात माझा नाइलाज आहे.

मला आजही आठवतो तो दिवस... मी सहज तुला बोलण्यासाठी आलो मात्र तू चक्क यापुढे मी तुला कधीच बोलणार नाही असे म्हणालीस. पण आजपर्यंत आपण जे काही केले ते काही चुकीचे होते का? अरे सोन्या, आपले प्रेम हे दुधासारखे पवित्र होते; पण काय माहीत काय झाले. तुला काय वाटते की आपल्या प्रेमाच्या विरहामध्ये काय तू फक्त एकटीच रडली आहेस का? अरे दिवस आणि रात्र मी फक्त आणि फक्त त्याच गोष्टीचा विचार करतो की, का तो काळा दिवस उजाडला व आपल्या नात्यामध्ये इतका दुरावा निर्माण झाला?

पण (योया) मला नक्कीच विश्वास आहे, तू एक ना एक दिवस नक्कीच परत माझी होशील. पण तुला माझी चूक नसल्याची जाणीव होईपर्यंत तुला खूप उशीर होईल. पण बघ त्या दिवशी का असेना तुला मात्र माझीच आठवण येईल. एक सांगतो (योया) जे प्रेम आधी तुझ्यावर होते ते पुढेही असेलच. तुझ्यापासूनच सुरुवात झाली होती आणि शेवटदेखील मला तुझ्याचसोबत व्हावा असे वाटते. अगं तू तर नेहमीच माझ्या हृदयात होतीस. तूच आहेस व कायम तूच राहशील. पण मला माझ्या एका प्रश्नाचे उत्तर देशील ना...

**का गं दुरावा, का गं अबोला**
**अपराध माझा असा काय झाला ?**

## मन माझे

आजही आठवतोय.. मला तो दिवस, ज्या दिवशी आपण दोघं पहिल्यांदाच भेटलो होतो. आपल्या दोघांची ओळख देखील नव्हती, परंतू चमत्कारच म्हणावा लागेल ना? की आपण आज आपण इतक्या जवळ आलोत... त्या दिवशी तू अचानकपणे काहीही न सांगता पुण्याला निघून गेलीस, त्या वेळेस तर मी खूप निराश झालो होतो. कारण माझ्या मनात सारखा एकच प्रश्न घोळत होता की, माझ्या मनातलं सांगीतलं असतं तर बरं झालं असतं? पण काय करणार हिम्मतच होत नव्हती.

आणि तो दिवस आठवतो, त्या दिवशी तू पूण्याहून येताना मला कॉल केला होतास, म्हणालीस, नितीन मी तुझ्या लातूर ला येतेय. कित्येकदा भेटलो तरी भेटीची ओढ काही कमी होत नाही... तुला भेटल्या शिवाय मला क्षणभरही राहवत नाही... मनात माझ्या आस आहे... एका भेटीची. दुरावा सहन होत नाही.. ये ना गं लवकर सखे, तुझ्यावीना मला जरा ही करमत नाही... असेच काहीसे गुणगुणत मी तूला भेटण्याच्या आतुरतेने रात्री झोप आली नव्हती. कारण कधी एकदाची ती रात्र संपते आणि सकाळ होते आणि कधी एकदाचा मी तूझा चेहरा पाहतो मला असेच झाले होते. कारण तूला भेटण्याचा एक एक क्षण, जवळ जवळ येत होता तस-तसा, माझ्या मनातली भीती देखील अधीकच वाढत जात होती. कारण आज कित्त्येक दिवसांपासून आपण भेटणार होतो. तसच तू लातूर मध्ये परत येण्याची मी देवापुढे केलीली प्रार्थना देखील आज पुर्ण होत होती.

सकाळ झाली व ठरल्याप्रमाणे ती घरी आली. परंतू ती येत असताना माझ्या काळजाचा ठोका अधीकच वाढत होता. ती माझ्याजवळ येताच मी तिला हसतच गुड मॉंर्निंग म्हणालो, तिनं पण मला हसत हसत गुड मॉंर्निंग केलं. तेव्हा कुठंतरी मला थोडंस बरं वाटलं,  माझ्या जिवात जिव आला नंतर काही दिवस असेच गेले. मग आमच्या गप्पा वगैरे सुरू झाल्या. त्या नंतर काही दिवसांनी मी तीला माझ्या मनातील सांगुन टाकायचं ठरवलं. परंतू विचार करू लागलो की ती काय म्हणेल?

शेवटी भीत भीत तिला बोललो, योयो' मला तुला काही तरी सांगायचं आहे, ती लाजत लाजत बोलली,  बोलना मी डोळे मिटून धीर धरून तिला म्हंटले **आय लव यु... !**

त्यावेळी तिनं खाली वाकून सॅंडल पकडणार एवढ्यातच मी तिच्यापासून, दूर अंतरावर जावून माझ्या गालावरती हात लावून उभा राहिलो, पण ती सॅंडलची पट्टी लावत , **मला सेम टु यु... !!!** म्हणाली. हे पाहुन तर मी मोठ मोठ्यानं हसू लागलो.. कारण तिनं जो मला होकार दिला होता, तो खुपच अनोखा  होता. काय आहे असं खास तुझ्यात, ते शोधता शोधता उत्तर सापडलं मला माझ्या या काळजात. जे इतर  मुलींमध्ये नाही असंच काहीतरी आहे तूझ्यात एक सुंदरसा गोडवा आहे... तूझ्या या स्वभावात  एक वेगळीच दुनिया दिसते मला तुझ्या या डोळयांत. तुझ्यासारखी दुसरी कोणी मला भेटणं शक्य नाही मला ह्या जगात.

## क्षण एक पुरे प्रेमाचा...

**माझंही तसंच झालं, माझ्यासारखं अनेकांचं असंच होत असेल...**

ते कॉलेजातील स्वप्नाळू दिवस मला आजही आठवतात, कारण घडलंच होतं असं काही... की ते हळवे दिवस आठवले की, अंगावर रोमांच उभे राहतात.

आमच्या गावापासून कॉलेज दूर असल्यामुळं मी रोज एसटी बसने प्रवास करायचो. रोजच्यासारखंच मी कॉलेजला जाण्यासाठी निघालो होतो. तेच मित्र आणि तीच रोजची बस आणि दैनाही तीच असायची. रोजच बसमध्ये बसून मस्ती करीत असायचो.

त्या दिवशी नेहमीसारखं कॉलेजध्ये, वर्गात मित्रांशी गप्पा मारत बसलो होतो. तेव्हा आमच्या वर्गात एक नवीन मुलगी आल्याचं समजलं. क्लासमधील सरांनी तिचा आम्हा सर्वांना परिचय करून दिला. ती अतिशय सुंदर तर होतीच पण एकदम शांत आणि सोज्वळ स्वभावाचीदेखील होती. अभ्यासात पण अतिशय हुशार होती.

एके दिवशी ती कॉलेजात उशिरा आल्यामुळे तिचा राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी माझ्याजवळ आली व म्हणाली, मला माझा राहिलेला अभ्यास पूर्ण करावयाचा आहे, त्यामुळं तू तूझी नोटबुक देशील का? मी पण लागलीच हो म्हणालो आणि तिला नोटबुक दिले.

मग ती दुसऱ्या दिवशी नोटबुक घेऊन आली. मी माझ्या मित्रांत गप्पा मारण्यात मश्गुल असल्यामुळे ती थांबली होती. परंतु शेवटी कंटाळून तिला न

राहवल्याने  तिने “नितीन... ’ असा आवाज दिला. तिनं आवाज देताच माझे सर्व मित्र अवाक् झाले. अगदी पिनड्रॉप सायलेन्स... मी तिच्याकडून माझी नोटबुक घेतली व तिला म्हटलं की, तुला माझं नाव कसं माहीत? तेव्हा तिनं सांगितलं की, अरे तुझ्या नोटबुकमध्ये वाचलं. मग आम्हा दोघांचा परिचय झाला.  ती आमच्या गावाच्या शेजारील गावची होती. तिचं गाव माझ्या गावापासून अवघ्या पाच कि. मी. अंतरावर आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही दोघेपण एकाच एसटीनं गावाकडं जात असतो, हे मला आता कळालं होतं. यावर आम्ही दोघेपण जोरजोरात हसू लागलो... कारण की साधारणत: आठ-दहा दिवस झाले असतील आम्ही दोघंही एकाच बसमध्ये प्रवास करीत होतो, परंतु हे आम्हाला माहीत नव्हतं. मग काय तसेच गप्पा मारत बसस्टॅण्डवर कधी पोहोचलो हे आम्हाला कळालेच नाही. मग बसमध्ये ती एका मुलीजवळ जाऊन बसली  आणि मी मागे मुलांसोबत बसलो. माझं गाव आलं तेव्हा मी उतरलो. ती मला हसतच बाय.. म्हणाली... मी पण तिला प्रत्युत्तरादाखल “बाय.. उद्या भेटू असं म्हटलं आणि तेथून घराकडं  चालता झालो.

दुसऱ्या दिवशी देखील आमची त्याच बसमध्ये भेट झाली व आम्ही दोघेजण मिळूनच कॉलेजला गेलो. चालत जात असताना तिला मी म्हटलं, तू तर हुशार आहेस मग इतक्या दिवस कॉलेजला का आली नव्हतीस? यावर ती म्हणाली, माझे वडील नोकरीला असल्यामुळे त्यांची सारखीच बदली होत असते. त्यामुळेच मला कॉलेजला यायला उशीर झाला. आमच्या अशाच गाठी व्हायच्या. यातूनच

आमची  इतकी चांगली  मैत्री झाली की एक दिवसही ती कॉलेजला आली नाही की, चुकल्याचुकल्यासारखं वाटायचं. वर्गात लक्ष लागत नसायचं.

सुरुवातीला मी तिच्या शेजारीही मी बसत नव्हतो, कारण मलाच भीती वाटायची. गाडीला गर्दी होत असल्याने मी ताटकळत उभा राहायचो. साधारण पंधरा दिवसांनंतर तिला काय वाटलं कुणास ठाऊक, तिनं येतानाच तिच्या शेजारी हातरुमाल टाकून जागा धरली; पण मी बसलो नाही. तिनंच बस ना, म्हटल्यावर अंग चोरत बसलो... आणि त्या दिवसापासून सुरू  झाला आमचा एक अनोखा आणि हळवा प्रवास...

एकाच बसमध्ये एकाच सीटवर बसून गप्पागोष्टीचं रुपांतर कधी  प्रेमात झालं हे कळालंच नाही. कितीही गर्दी असली तरी मी बेफिकीर असायचो, कारण माझी जागा राखून ठेवणारी माझी “ती’ त्या गाडीत असायची. म्हणून  गप्पांच्या ओघात स्टँड कधी यायचं कळायचंच नाही. आमच्या प्रेमाला ती बस, तो वाहक, चालक, रोज येणारे विद्यार्थी हे साक्षीदार होते. कारण ते माझे पहिले प्रेम होते...

रविवारी ती येत नसल्यानं माझं मन नेहमीच बेचैन व्हायचं, सोमवारी तिला पाहल्यिाशिवाय करमत नसायचं, गोड हसायची आणि गोड बोलायची, सारखी मला वर्गात पाहण्यासाठी नेहमी वर्गातील एक बाजू धरून बसायची व क्लास सुटताक्षणी पाहून हसत राहायची. असेच आमच्या दोघांचे दिवसामागून दिवस जात होते. मला तर असं वाटायचं की हा काळ कधीही संपू नये. त्या दिवशी मी तिला म्हटलं.. ये (योयो) आपण लग्न कधी करायचं? ती हसत म्हणाली, जेव्हा आपले कॉलेज संपेल तेव्हा आपण लग्न करूयात. असं म्हटल्यानंतर आम्हा दोघांच्याही डोळयांमध्ये आता पुढील स्वप्नं दिसत होती. शक्षिण संपल्यावर जीवनसाथी बनण्याच्या आणाभाका  घेतल्या  होत्या,  कॉलेज कॅन्टीन, सगळीकडेच आमच्या प्रेमाच्या चर्चा असायच्या. परीक्षा जवळ आली होती. आम्ही अभ्यासाला लागलो होतो. एकदाची

परीक्षा संपली. शेवटच्या पेपरला आम्ही भेटलो. आता काही दिवस एकमेकांपासून दूर राहावे लागणार... म्हणून दोघांच्याही चेहऱ्यावर उदासी होती. त्या दिवशी जड पावलांनी तिचा निरोप घेतला... पण काही दिवसांनीच कळालं की, तिच्या वडिलांची बदली झाली आणि ती औरंगाबादला निघून गेली.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com